MHBI120009332021

## नियमीत दिवाणी दावा क्र.१८८/२०२१ मधील नि.क्र. ०५ खालील आदेश

सदरचा अर्ज वादी यांनी तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाखल केला आहे.

२. मौजे संगम, ता. धारुर, जि. बीड येथील सर्व्हे क्र. १७५ मधील तुकडा नं. १ व तुकडा नं. २ व सर्व्हे क्र. १७६ मधील तुकडा नं. १, २ व ३ ज्याच्या चतुःसिमा अर्जाच्या कलम ३ मध्ये देण्यात आल्या आहेत (ज्यास यापुढे 'वाद मिळकत' असे संबोधण्यात येत आहे ) ही वाद मिळकत आहे.

३. वादी यांचे थोडक्यात कथन असे आहे की, वादी व प्रतिवादी हे एकाच गावातील रहिवाशी असुन त्यांचे शेत शेजारी शेजारी आहे. वाद मिळकतीमधील काही मिळकत वादीची वडीलोपार्जीत मिळकत असुन सर्व्हे क्र. १७६ मधील तुकडा नं. ३ व सर्व्हे क्र. १७५ मधील तुकडा नं. २ वादी क्र. २ यांनी खरेदी घेतलेला आहे. वाद मिळकती वादी यांच्या ताबेकब्जात असुन ते त्यांचा उपभोग घेत आहेत. दिनांक १९.०६.२०१५ रोजीच्या अर्जाच्या खुलाशाप्रमाणे दिनांक ३०.०६.२०१५ रोजी तहसिलदार कार्यालय, धारुर यांच्या समोर पंचनामा करण्यात आला व त्या अनुषंगाने सन २०१५-२०१६ च्या खरीप हंगामात

शेत मशागतीसाठी पाउल रस्त्याचा वापर करण्याबाबत आदेश तहसिलदार, धारुर यांनी दिनांक २१.०७.२०२० रोजी दिलेला आहे. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांनी पंचासमक्ष आपापल्या जमीनीतून चार फुट रुंदीचा वहीवाट रस्ता देवून वाद मिटवला होता. सदर रस्त्याचा वाद कायमस्वरुपी मिटवायचा असलयास वादी व प्रतिवादी यांनी मोजणी करुन वाट निर्माण करावी असे तहसिलदार, धारुर यांनी सदर निकालात म्हटलेले आहे. परंतु सदर निकालाचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ ते ४ हे वाद मिळकतीच्या पूर्व-पश्चिम असलेल्या वाटणीमधून वादीच्या उसाच्या पिकामधून ट्रॅक्टर, बैलगाडी व पिकअप असे वाहने घेवून जात आहेत. त्यामुळे वादीचे अतोनात नुकसान होत आहे. प्रतिवादी हे मनुष्यबळाच्या जोरावर वादीच्या भर पिकातून वाहने घेवून जात आहेत.

४. तहसिलदार, धारुर यांनी केलेल्या पंचनाम्यामध्ये व त्यानंतर झालेल्या निकालामध्ये वाद मिळकतीची मोजणी करण्यास दोन्ही पक्षकारांनी संमती दर्शविलेली आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात तहसिलदार, धारुर यांनी मिटवलेला वाद व त्या अनुषंगाने काढुन देण्यात आलेला ४ फुटाच्या रस्त्याच्या जोरावर प्रतिवादी हे वाद मिळकतीमधून बैलगाडी, ट्रॅक्टर व चार चाकी वाहने भर पिकातून घालत आहेत व सदर वाट रुंदावत आहेत. त्यामुळे वादीचे नुकसान होत आहे. त्याबाबत प्रतिवादीने वादी यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, प्रतिवादी यांनी मनगट शाहीच्या जोरावर सदर रस्ता कायमस्वरुपी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रतिवादींनी वाद मिळकतीमधून रस्ता निर्माण केल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादीस सकृतदर्शनी

केस आहे. न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजून आहे. सबब वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

५. प्रस्तुतचे प्रकरण प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द विना कैफियत चालविण्याबाबत आदेश दिनांक १७.०३.२०२२ रोजी पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी निशाणी क्र. २३ अन्वये त्यांची लेखी कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे म्हणणे असे आहे की, तहसिलदार, धारुर यांनी दिनांक २१.०७.२०२० रोजी वादी व प्रतिवादी क्र. १ यांचा दिनांक १९.०६.२०१५ रोजीच्या अर्जाच्या खुलाशाप्रमाणे पंचनामा करुन सन २०१५–२०१६ या वर्षासाठी शेती मशागतीसाठी पाउल रस्त्याचा वापर करण्याबाबतचा आदेश पारीत केला आहे व चार फुट रुंदीचा रस्ता काढुन दिला आहे. वादीने वाद मिळकतीच्या चुक चतुःसिमा नमुद केल्या आहेत. तहसिलदार, धारुर यांनी वादी व प्रतिवादी यांच्यामधील रस्त्याचा वाद संपूष्टात आणलेला आहे. प्रतिवादी क्र. १ हा तहसिलदार, धारुर यांच्या आदेशाप्रमाणे येणेजाणे करण्यासाठी रस्त्याचा वापर करत आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ हे आवश्यकता असल्यास त्या रस्त्याचा वापर करतात. प्रतिवादी क्र. २ ते ४ हे येण्याजाण्यासाठी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेला पूर्व–पश्चिम नंबर बांधाचा वापर करतात. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी वादीच्या उसाच्या पिकामधून कधीही ट्रॅक्टर, बैलगाडी अथवा इतर कोणतेही वाहन घालून नुकसान केले नाही. वादीने प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना त्रास देण्यासाठी खोडसाळपणे त्यांच्याविरुध्द दावा दाखल केला आहे.

६. सर्व्हे क्र. १७६ मध्ये प्रतिवादी क्र. २ यांनी विकत घेतलेली जमीन आहे. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना सर्व्हे क्र. १७५ व १७६ मध्ये वाटणी प्रमाणे जमीन मिळालेली आहे. सदर जमीन प्रतिवादी हे वहीती करुन उपभोग घेत आहेत. प्रतिवादी क्र. २ यांनी खरेदी घेतलेल्या जमीनीमध्ये असणारी चिंच, सिताफळ व लिंब इत्यादी झाडे याचा उपभोग घेण्याचा वादी प्रयत्न करत आहेत. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यामध्ये असलेल्या संपूर्ण जमीनीचा बांध फोडलेला आहे व ती जमीन वादीने स्वतःच्या ताब्यात घेतलेली आहे. प्रतिवादी यांचा बांध कोरुन वादी प्रतिवादींच्या मालकीचे शेतामध्ये वहीती करण्याचा प्रयत्न करतात. प्रतिवादी त्यास विरोध करत असल्यामुळे वादीने प्रस्तुतचा चुक व खोटा दावा व अर्ज दाखल केला आहे. वादीस दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. वादीस सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल प्रतिवादींच्या बाजूने आहे. सबब, वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

७. अर्ज, त्यावरील म्हणणे व वादी यांनी दाखल केलेले कागदपत्र याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद सविस्तर ऐकला.

८. माझे विचारार्थ निघालेले मुददे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण आहे काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा तराजू वादी यांच्या हक्कात आहे काय ? | नाही. |
| ३. | अर्ज नामंजूर झाला तर वादी यांचे न भरुन येणारे नुकसान होईल काय? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

९. वादी यांनी अर्जाच्या पुष्ठर्थ, सर्व्हे क्र. १७५ व १७६ चे ७/१२ उतारे, सर्व्हे क्र. १७५ व १७६ च्या एकत्रीकरणाचा नकाशा, दिनांक १९.०९.२०११ रोजीचा गैरन्यायीक मुद्रांकावर लिहीलेला करारनामा, दिनांक २१.०७.२०२० रोजीचे तडजोडीची व दिनांक १०.०७.२०२० रोजीचे पंचनाम्याची तहसिलदार, धारुर यांनी दिलेली साक्षांकीत प्रत दाखल केली आहे. प्रतिवादी यांनी कोणतेही कागदपत्र दाखल केले नाहीत.

१०. वादी यांच्या विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादीची वाद मिळकतीमधील मालकी प्रतिवादी यांनी नाकारलेली नाही. तहसिलदार, धारुर यांनी जो तात्पुरत्या स्वरुपात रस्ता काढुन दिला होता, त्याचा गैरवापर करुन प्रतिवादी हे वादीच्या वाद मिळकतीमध्ये कायमस्वरुपी रस्ता निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. तसे झाल्यास

वादीचे न भरुन येणार नुकसान होणार आहे. सबब, वादीचा अर्ज मंजूर करण्यात यावा व प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम पारीत करण्यात यावा. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्या विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, तहसिलदार, धारुर यांनी केलेल्या पंचनाम्याप्रमाणे व दिलेल्या आदेशाप्रमाणे काढुन देण्यात आलेल्या रस्त्याचा वापर सर्व प्रतिवादी करत आहेत, त्यांनी वाद मिळकतीमध्ये कधीही वादींच्या पिकामध्ये कोणतेही वाहन घातलेले नाही. प्रतिवादींना त्रास देण्यासाठी वादीने मुददाम प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादीला दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

**<u>मुददा क्र. १ करीता</u> :-**

११. अर्ज, त्यावरील म्हणणे, अभिलेखावरील दाखल कागदपत्र यांचे अवलोकन केल्यानंतर व दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाद मिळकतीच्या अनुषंगाने वहीवाट रस्त्याचा वाद तहसिलदार, धारुर यांच्यासमोर सुरू होता व त्याबाबत दिनांक १९.०६.२०१५ रोजी तहसिलदार, धारुर यांच्याकडे अर्ज दाखल करण्यात आला होता. दिनांक २१.०७.२०२० रोजी तहसिलदार, धारुर यांनी तात्पुरत्या स्वरुपात वाद मिळकतीमधून ४ फुटाचा वहीवाट रस्ता काढुन दिलेला आहे . वादी यांचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादी, यांना तहसिलदार, धारुर यांनी काढुन दिलेला तात्पुरता रस्ता हा कायमचा रस्ता नसताना त्यामधून प्रतिवादी वहीवाट रस्ता निर्माण करत आहेत व त्याद्वारे वादीच्या वाद मिळकतीमधील शांततामय उपभोगास

अडथळा निर्माण करत आहेत.

१२. वादीचा दावा पाहिला असता वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठरावासाठी व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. वादीने दाव्याच्या विनंती कलम 'ब' मध्ये वाद मिळकतीवर पूर्व पश्चिम बांधावरुन देण्यात आलेला रस्ता बंद करण्यात यावा व ती मिळकत वादीची आहे असे जाहीर करण्यात यावे अशा स्वरुपाची मागणी केलेली आहे. प्रस्तुत तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जामध्ये वादीने प्रतिवादी यांच्या विरुध्द वाद मिळकतीमधील वादीच्या वहीवाटीस हरकत अडथळा करु नये अशा प्रकारचा अंतरिम मनाई आदेश मागीतलेला आहे. वर नमुद केल्याप्रमाणे वाद मिळकतीमधून तहसिलदार धारुर यांनी दिनांक २१.०७.२०२० रोजी तात्तुरता रस्ता काढुन दिल्याचे उभयपक्षांना मान्य आहे. वादीचा दावा व मनाई हुकुमातील कथने याचा एकंदरीत विचार केला असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दाव्याद्वारे वादी हे तहसिलदार, धारुर यांनी काढुन दिलेला तात्तुरता वहीवाट रस्ता बंद करुन मागत आहेत.

१३. तहसिलदार, धारुर यांनी काढुन दिलेला तात्पुरता वहीवाट रस्ता बंद करुन घेण्याबाबत वादीने तहसिलदार, धारुर अथवा त्यांचे अपिलीय अधिकारी यांच्याकडे कोणताही अर्ज दाखल केलेला नाही. वादीने सदर तात्पुरता रस्ता बंद करण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. या ठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, वादीचे असे म्हणणे नाही की, तहसिलदार, धारुर यांनी काढुन दिलेला तात्पुरता वहीवाट रस्ता हा चुकीच्या पध्दतीने काढुन दिलेला आहे. म्हणजेच तहसिलदार, धारुर यांनी काढुन दिलेला

तात्पुरत्या रस्ता काढुन देण्याची प्रक्रिया चुकीची असल्याचे वादीचे म्हणणे नाही. अशा परिस्थीतीत वादीने मागणी केल्याप्रमाणे तहसिलदार, धारुर यांनी काढुन दिलेला तात्पुरता वहीवाट रस्ता बंद करुन घेण्यासाठी वादी यांनी योग्य त्या न्यायाधिकरणाकडे कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन दाद मागणे गरजेचे आहे. परंतु तसे न करता वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

१४. तहसिलदार, धारुर यांनी काढुन दिलेल्या ४ फुटाच्या तात्पुरत्या रस्त्याव्यतिरीक्त वादीच्या वाद मिळकतीतून प्रतिवादी यांनी वहीवाट करु नये असा अंतरिम मनाई हुकुम वादीने मागीतलेला नाही. उलटपक्षी वादीने वाद मिळकतीमध्ये वादीचे कब्जेवहीवाटीस प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये अशा अंतरिम हुकुमाची मागणी केली आहे. वर नमुद केल्याप्रमाणे वादीने त्याच्या मिळकतीमधून काढुन दिलेल्या तात्पुरता रस्ता बंद करुन घेण्यासाठी तहसिलदार अथवा त्यांचे अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज/अपिल दाखल करण्याचा व त्याद्वारे सदर रस्ता बंद करुन घेण्याचा पर्यायी सक्षम उपाय उपलबध असताना, सदर उपाय न अवलंबता वादीने प्रस्तुतचा दावा/अर्ज दाखल केला असल्यामुळे विशिष्ट दिलासा अधिनियम, १९६३ चे कलम ४१ (एच) ची बाधा प्रस्तुतच्या अर्जास येत आहे. सबब, वादी मागणी केल्याप्रमाणे मनाई हुकुम मिळण्यास पात्र असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत नाही. ज्याअर्थी वादी मनाई हुकुम मिळण्यास पात्र असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत नाही, त्याअर्थी वादीने प्रस्तुत दाव्यात मनाई हुकुमाच्या अनुषंगाने गुणदोषावर चालवता येण्याजोगा, चौकशी करता येण्याजोगा व तपास करता

येण्याजोगा मुददा दाखवून दिलेला नाही. ज्याअर्थी वादीने तसा मुददा दाखवून दिलेला नाही, त्याअर्थी वादीस सकृतदर्शनी प्रकरण दिसुन येत नाही. सबब, मी मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र. २ व ३ करीता</u> :-**

१५. मुददे क्र. २ व ३ यांची कारणमिमांसा ब-याच अंशी सारखी असल्याने मी दोन्ही मुददे एकत्रीतपणे चर्चेसाठी घेत आहे.

१६. न्यायाचा समतोल कोणाच्या हक्कात आहे हे ठरवण्यासाठी वादी यांच्या लाभात मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादी यांना होणारे नुकसान व वादी यांच्या लाभात मनाई हुकुम न दिल्यास वादी यांना होणारे नुकसान याचा समतोल पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जात अप्रत्यक्षपणे वादीने तहसिलदार, धारुर यांनी काढुन दिलेला तात्पुरता रस्ता बंद करुन मागीतला आहे. वादीच्या मागणीप्रमाणे अंतरिम मनाई हुकुम दिला गेल्यास तात्पुरता वहीवाट रस्ता प्रतिवादींना वापरता येणार नाही व त्यामुळे प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. तसा मनाई हुकुम न दिला गेल्यास वादीचे होणा-या नुकसानापेक्षा मनाई हुकुम दिला गेल्यास प्रतिवादींचे होणारे नुकसान जास्त आहे. सबब न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने दिसुन येत आहे. वादीच्या मागणीप्रमाणे अंतरिम मनाई हुकुम दिला गेल्यास प्रतिवादींना तहसिलदार धारुर यांनी काढुन दिलेला तात्पुरता वहीवाट रस्ता वापरता येणार नाही व त्यामुळे प्रतिवादी यांचे अपरीमीत नुकसान होणार आहे. उलटपक्षी वादी यास तसे

कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मी मुददे क्र. २ व ३ यांची उत्तरे नकारार्थी देत आहे.

**मुददा क्र. ४ करीता :-**

१७. तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यास वादीस सकृतदर्शनी प्रकरण, न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने व अर्ज मंजूर न केल्यास वादीस होणारे अपरिमीत नुकसान सिध्द करणे गरजेचे आहे. वादीस वरील तिन्ही मुददे एकत्रीतपणे प्रकरणात असल्याबाबत प्रथमदर्शनी पुरावा देणे गरजेचे आहे. वरील तिनही मुददे वादीने वाद मिळकतीबाबत प्रथमदर्शनी सिध्द केले नाहीत. मुददे क्र. १ ते ३ चा सांगोपांग विचार करता मुददे क्र. १ ते ३ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने वाद हा वाद मिळकतीबाबत तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाही. सबब मुददा क्र. ४ वे उत्तरार्थ मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाच्या खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAJENDRA VASANT KADAM
Date: 2023.03.31 17:27:36 +0530

स्थळ-धारुर (रा.व.कदम )

दिनांक २९.०३.२०२३ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

धारुर

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड–३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | **२९.०३.२०२३** |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | **२९.०३.२०२३** |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | **२९.०३.२०२३** |

सही/–

(**ए.एस.गंगणे**)

(लघुलेखक ग्रेड–३)

दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर